Indian Streams Research Journal
Volume 2, Issue.12,Jan. 2013
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# छत्रपती शिवाजी महाराजांचा मराठवाडा संबंध

*आर. एस. वायाळ*

सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
लालबहादुर शास्त्री वरीष्ठ महाविद्यालय, परतूर जि. जालना

*सारांश*

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात मराठवाडयाच्या भूमिशी एक–दोन प्रसंगीच संबंध आला असे म्हणता येईल. शिवाजीने मोगलांशी पुरंदरचा तह केला त्यातील अटी नुसार आग्र्याला भेटीला जातांना शिवाजी महाराज औरंगाबादहून गेले, दुसरे मराठवाडयातील जालना ही बाजारपेठ लुटताना मराठवाडयाशी संबंध आला.

## प्रस्तावना

मराठवाडा हा विभाग महाराष्ट्रातील एक महत्वाचा भाग असला तरी, 17 व्या शतकात 'मराठवाडा' हा शब्द रूढ नव्हता. टिपु सुलतानाच्या कारकीर्दीत 'मराठवाडी' शब्दाचा प्रथम उल्लेख आढळतो. 18 व्या शतकाच्या उत्तरार्धात हा उल्लेख हैद्राबाद संस्थानातील मराठी भाषिक प्रदेशाच्या म्हणजेच सध्याच्या मराठवाडयाच्या संदर्भातील होय. हैद्राबाद संस्थानाच्या कागदोपत्रीही पुढे या प्रदेशाचा 'मराठवाडी' असाच उल्लेख आढळतो. याचेच पुढे 'मराठवाडा' असे रूपांतर होऊन तेच नाव या प्रादेशिक विभागाला रूढ झाले आहे.[1]

### *छत्रपती शिवाजी : मराठवाडा संबंध :–*

सोळाव्या शतकापासून मोगलांचा महाराष्ट्राशी संबंध आला. मोगलाचा सेनापती महाबत खानाने दौलताबादचा किल्ला सन 1633 मध्ये जिंकून घेतला.[2] दौलताबादचा महत्वाचा किल्ला मोगलांच्या ताब्यात आल्यावरही शहाजीने निजामशाही संपवू दिली नाही. शहाजीने निजामशहाच्या एका नातलगास भीमगड येथे गादीवर बसविले.[3] सन 1660 मध्ये शाहीस्तेखान पुण्यास ठाण मांडून बसलेला असतांना त्याच्या कारतलबखान या सरदाराने परिंडा किल्ला जिंकला. युध्द न करताच हा किल्ला मोगलांनी जिंकून घेतला.[4]

छत्रपती शिवाजी महराजांनी स्वराज्याची स्थापना केल्यावर प्रदेश जिंकून घेण्याचे धोरण ठरविले. प्रथम शिवाजी महाराजांनी दक्षिणेकडील आदिलशाही आणि निजामशाहीच्या ताब्यातील प्रदेश जिंकून घेण्याचा प्रयत्न केला. सध्याच्या मराठवाडयातील बहुतेक प्रदेश मोगलांच्या ताब्यात होता. सन 1680 पर्यंत शिवाजीने महाराष्ट्रातील काही प्रदेश जिंकून घेतला होता. तसेच काही शहरे लुटली होती. मराठवाडयावर जास्त आक्रमणे शिवाजीने केली नव्हती. या प्रदेशावर आक्रमण करण्याचा विचार त्याने का टाळला याची काही कारणे पुढील प्रमाणे असावीत.

1)सपाट प्रदेश जिंकल्यानंतर त्या प्रदेशाचे प्रशासन चालविणे कठीण काम होते. म्हणून त्याने मराठवाडा हा जिंकून घेण्यास सोपा प्रदेश असूनही जिंकून घेतला नाही.
2)नळदुर्ग आणि परिंडा हे दोन महत्वाचे किल्ले या प्रदेशात होते. मोगलांनी या किल्ल्याचे रक्षण भक्कमपणे केलेले होते.
3)मराठी भाषिकांची संख्या जास्त असल्यामुळे आपल्याच बांधवावर आक्रमण करणे शिवाजीला योग्य वाटले नसावे.
4)मोगलांच्या दक्षिण सुभ्याचे ठिकाण औरंगाबाद हे होते. त्यामुळेच या भागाच्या संरक्षणाकडे मोगलांचे जास्त लक्ष होते.

शिवाजीच्या आजच्या मराठवाडा प्रदेशाशी एक – दोन वेळा संबंध आला. सन 1666 शिवाजी आणि जयसिंह यांच्यात पुरंदरचा तह झाला. तहान्वये दोघांनी विजापूरची मोहिम हाती घेतली परंतु ती अपयशी ठरली. जयसिंहाने शिवाजीस आग्र्यास औरंगजेब बादशहाच्या भेटीस जाण्याचे सांगितले. 5 मार्च 1666 रोजी शिवाजी उत्तरेस निघाला. शिवाजी आणि संभाजी दोघांचे औरंगाबाद येथे आगमन झाले.[5] थोडे दिवस थांबून आग्र्यास शिवाजी गेले.

शिवाजीने आग्रा येथून परत आल्यानंतर मोगलांशी नरमाईचे धोरण स्विकारले. 22 एप्रिल 1667 च्या पत्रात शिवाजीने औरंगजेबास लिहिले की, ''हिंदुस्थानच्या बादशहाची मोठी फौज मजवर चालुन येत आहे. या फौजेशीं टक्कर देण्याचें सामर्थ्य पृथ्वीमध्यें कोणास तरी आहे काय? म्हणुन माझी अशी नम्र विनंती आहे की, माझा मुलगा संभाजी यास चार हजार स्वारांची मनसब बादशाही फौजेंत मिळावी. मनसब न मिळाली तरी ही फौज घेऊन नेहमी तो बादशहाची नोकरी करीत राहणार. माझ्या ताब्यात किल्ले होते ते सर्व मी बादशहाकडे सोंपून दिले आहेतच; आणि अद्यापि जे कांही किल्ले माझ्याकडे आहेत ते व माझी सर्व जिंदगी, आपल्या सेवेस अर्पण आहे.''[6] या पत्राचे उत्तरे आले नाही. तेव्हा शिवाजीने जसवंतसिंहास पत्र लिहून आपण बादशाहाशी गोडी करण्यास तयार आहोत, असे सुचविले. शहजादा मुअज्जम आणि जसवंतसिंह यांनी त्यास संमती दर्शविली. शिवाजीने बाळाजी आवजी चिटणीसास लवाजमा देऊन औरंगाबादेस पाठविले आणि पुर्वीच्या पुरंदरचा तह मंजुर करावा असे ठरून ती सुचना शहाजाद्याने बादशहाकडे पाठविली.[7]

**Title :** *छत्रपती शिवाजी महाराजांचा मराठवाडा संबंध*
**Source:Indian Streams Research Journal [2230-7850]** *आर. एस. वायाळ* **yr:2013 vol:2 iss:12**

सन 1679 मध्ये शिवाजीने आदिलशहाशी तह केला.[8] तहान्वये दोघांनी मिळून मोगलांचा प्रतिकार करावयाचा असे ठरले. शिवाजीने जालना हे मोगलांचे शहर नोव्हेंबर 1679 मध्ये लुटले. जालना लुटल्याचा वृतांत सभासदकृत 'श्री शिवछत्रपतींचे चरित्र' मध्ये येतो. मोगलाईतले जालनापूर म्हणजे आजचे जालना शिवाजीराजे यांनी लुटले ही त्यांच्या आयुष्यातील अखेरची स्वारी ठरली. खरे तर रणमस्तखान यास कैद केल्यानंतर त्याला सोडवण्यासाठी केसरसिंग, सरदारखान यांच्यासह मोगलसैन्य औरंगाबादहून निघाले. सैन्य 6 मैलांवर असतांना शिवाजीला निसटून जाण्याचा अवधी केसरसिंगानी दिला.[9]

जालना लुटीचा उल्लेख शिवाजीने व्यंकोजीला लिहलेल्या पत्रात करतात, ''दिलेरखानास तीन गावाचे अंतर सोडुन भीमा नदी उतरून तहद जालनापुर पावेतो मुलुख ताख्तताराज करीत चाललो. जालनापुरास जाऊन चार दिवस मुक्काम करून पेठ मारिली. बहूत मालमत्ता (हाती) लागली. जालनापुरास म्हणजे औरंगाबादेहुन चार गावे ते जागा शहजादा असता त्याचा हिसाब न धरता पेठ लुटली. सोने रूपे हत्ती घोडे याखेरीज मत्ता बहुत सापडली''[10] जालना मोहिमेतून प्रचंड द्रव्य शिवाजीला मिळाले. शिवाजीने विजापूर तहाचे पालन केले. दिलेरखानाने विजापूरचा वेढा उठविला.

## *समारोप :–*

शिवाजी महाराजाच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात मराठवाडयाशी संबंध फारसा आला नाही. त्यांनी प्रदेश मिळविताना प्रशासन व्यवस्था भक्कमपणे चालविता येईल याची काळजी घेतली. मराठवाडा हा प्रदेश सपाट होता. त्यामुळे प्रशासन उभे करणे अवघड होते. शिवाजी महाराजांना याची जाणीव होती. मोगलांच्या दक्षिण सुभ्याची राजधानी औरंगाबाद होती, तिथे मोठी लष्करी कुमक होती. मराठवाडयात एक – दोन किल्ले वगळता जास्त किल्ले नव्हते. म्हणुन कदाचित शिवाजी महाराजांनी मराठवाडयावर आक्रमण करण्याचे टाळले असावे. तुळजाभवानी शिवाजी महाराजाचे कुलदैवत तुळजापुर येथे असले तरी त्यांनी देवीच्या दर्शनासाठी भेट दिली असा उल्लेख आढळून येत नाही.

## *संदर्भ ग्रंथ :–*

1.रोडे सोमनाथ, मराठवाडयाचा इतिहास (1960 पर्यंत), प्रथम आवृत्ती, जुन 1999, विद्य बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृष्ठ क्र. 1.
2.प्रमुख संपादक : स. मा. गर्गे व अन्य, मराठी रियासत, खंड 1, दुसरी आवृत्ती, 1988 ⁄ 1910, पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि., 301, मुंबई, पृष्ठ क्र. 70.
3.तत्रैव, पृष्ठ क्र. 71.
4.देशमुख विजय, शककर्ते शिवराय, खंड 1 ला, तिसरी आवृत्ती, छत्रपती सेवा प्रतिष्ठान प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. 396.
5.संपादक कुलकर्णी अ. रा., जेधे शकावली – करीना, सुधारित आवृत्ती, ऑक्टोबर 2007, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पृष्ठ क्र. 51.
6.देशपांडे प्र. न., छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे, पहिली आवृत्ती, 17 मार्च 1983, सुषमा प्रकाशन, संभाजी रोड, देवपुर, धुळे 2, पृष्ठ क्र. 112.
7.प्रमुख संपादक गर्गे स. मा. व अन्य, पुर्वोक्त, पृष्ठ क्र. 264.
8.संपादक कुलकर्णी अ. रा., खरे ग. ह., मराठयांचा इतिहास, खंड 1 ला, प्रथम आवृत्ती, 1984, कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे 30 आणि महाराष्ट्र विद्यपीठ ग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर, पृष्ठ क्र. 173.
9.संपादक भगत दत्ता, कृष्णाजी अनंत सभासद कृत श्री शिवछत्रपतीचे चरित्र, प्रथम आवृत्ती, 22 जुलै 2001, प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. 158.
10.देशपांडे प्र. न., पुर्वोक्त, पृष्ठ क्र. 240.